बी.एड, एम.एड, बी.पी.एड व एम.पी.एड अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीईटी-२०१५/प्र.क्र.४४०/मशि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २८ जानेवारी, २०१६.

<u>वाचा :</u> शासन अधिसूचना क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.२१०/मशि-२, दिनांक २१ जानेवारी, २०१६.

<u>प्रस्तावना :</u>

राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशाचे नियमन करण्यासाठी व शुल्क निश्चित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित बाबीसाठी तरतूद करण्याकरीता महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच संदर्भाधीन शासन अधिसूचने अन्वये, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड हे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

नमूद अधिनियमामध्ये खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या नियमनाची तरतूद करण्यात आली असल्याने खाजगी विना अनुदानित अभ्यासक्रमाबरोबरच शासकीय व अनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एक खिडकी पध्दतीने एकच प्रवेश प्रक्रिया राबवून राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित अध्यापक व शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्यस्तरीय सामाईक प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक व शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा यांच्या मार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे एक खिडकी पध्दतीने प्रवेश देण्यात येतील. यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणांच्या अनुक्रमानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेसाठीची गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार बी.एड, एम.एड, बी.पी.एड, एम.पी.एड अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येतील. यामध्ये खालील अभ्यासक्रमांचा समावेश राहील:-

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नाव	सामायिक प्रवश परीक्षेचा स्तर	सक्षम प्राधिकारी
१	पदवी अभ्यासक्रम (अ) बी.एड अभ्यासक्रम (ब) बी.पी.एड अभ्यासक्रम	राज्य सामायिक प्रवेश परीक्षा	आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा
२	पदव्युत्तर अभ्यासक्रम (अ) एम.एड अभ्यासक्रम (ब) एम.पी.एड अभ्यासक्रम	राज्य सामायिक प्रवेश परीक्षा	आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१५२८०८४३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Sakharam Bhalekar

Digitally signed by Rohini Sakharam Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rohini Sakharam Bhalekar
Date: 2016.01.28 16:29:56 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई,
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
४. उप सचिव, (तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
९. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शारिरीक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
१०.निवडनस्ती-मशि-२.